# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक १३/०९/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ**

---

### उमरेड पोलीस कडुन दोन घरफोडीचे गुन्हे उघड

दिनांक २२/०५/२०२४ रोजी पासुन ते दिनांक २९/०५/२०२४ रोजी १३/०० वा. पर्यंत गुन्ह्याचे तक्रारदार भास्कर नानाजी गर्दलवार रा. विठ्ठल रुक्माई मंदीर उमरेड हे परीवारासह बाहेर गावी गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने त्याच्या घरी प्रवेश करून घरातील सोन्याचे मौल्यवान दाग–दागीणे असा एकुण ९७,०००/– रू. चा मुद्देमाल चोरून घेवुन गेला. तसेच दिनांक १७/०८/२०२४ रोजी चे ०६/०० वा. पासुन ते दिनांक २५/०८/२०२४ रोजी च्या १९/३० वा. दरम्यान रमेशकुमार भगवानदास सींग, वय ३८ वर्ष, रा. लधवे ले–आउट घराला ताला लावुन बाहेर गावी गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने घरात प्रवेश करून घरातील सोन्या–चांदीचे मौल्यवान दाग–दागीणे असा एकुण ५०,०००/– रू. मुद्देमाल चोरी करून घेवुन गेले वरील नमुद दोन्ही तक्रारदार यांच्या तोंडी रीपोर्ट वरून पोस्टे उमरेड येथे अनुक्रमे (१) अप. क्र. २३९/२०२४ कलम ४५७, ३८० भा.द.वी., (२) ३५२/२०२४ कलम ३३१ (३), ३३१ (४), ३०५ (अ) भा. न्या. सं. अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले होते.

वरील नमुद दोन्ही गुन्ह्याचा समांतर तपास पोस्टे उमरेड येथील पोलीस स्टॉफ करीत असताना त्यांना मिळालेल्या गोपनीय माहीती वरून आरोपी क्र. ०१) सोमनाथ उर्फ गुड्डुडु प्रदिप खापेकर वय ३१ वर्ष, रा. गोळीबार चौक डोर्लीकर हॉस्पीटलच्या मागे नागपुर, ह. मु. परसोडी, उमरेड याला ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने पोस्टे उमरेड येथे वरील प्रमाणे दाखल असलेला अप. क्र. २३९/२०२४ कलम ४५७, ३८० भा.द.वी. चा गुन्हा त्याचा साथीदार आरोपी क्र. ०२ नामे यश मनोज निमजे वय २१ वर्ष, रा. पटवी गल्ली, गवळी बाबा मंदीर जवळ गोळीबार चौक तहसिल नागपुर याच्या सह केल्याचे सांगीतले वरून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली. अटक दरम्यान आरोपी सोमनाथ उर्फ गुड्डुडु प्रदिप खापेकर हा गुन्हयात नेहमी उडवा उडवीचे उत्तरे देत असल्याने त्याला कौशल्याने विचारपुस केली असता त्याने पोस्टे उमरेड येथे दाखल असलेला अप. क्र. ३५२/२०२४ कलम ३३१ (३), ३३१ (४), ३०५ (अ) भा. न्या.सं.चा सुध्दा एकटयाने केल्याचे कबुल केले. आरोपी सोमनाथ उर्फ गुड्डुडु प्रदिप खापेकर याच्या कडून अप. क्र. २३९/२०२४ कलम ४५७, ३८० भा.द.वी. मध्ये (१) एक सोन्याचा मंगळसुत्र किंमती ४०,०००/– रू. (२) एक सोन्याची अंगठी किंमती १२,०००/–रू. असा ५२,०००/– रू. मुद्देमाल व अप क्र. ३५२/२०२४ कलम ३३१ (३), ३३१ (४), ३०५ (अ) भा. न्या.सं.मध्ये चोरी गेलेल्या मुद्देमाला पैकी (१) सोन्या व चांदीचे दागीणे एकुण ४८,०००/– रू. चा मुद्देमाल व दोन्ही गुन्ह्यात वापरलेली मो.सा. क्र. एम.एच. ४०/बी.डब्लु– ७७९७ किंमती ४०,०००/– रू. असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अप. क्र. २३९/२०२४ कलम ४५७, ३८० भा.द.वी. मध्ये अटक असलेले दोन्ही आरोपी अनुक्रमे (१) सोमनाथ उर्फ गुड्डु प्रदिप खापेकर, (२) यश मनोज निमजे यांना आज रोजी न्यायालयात हजर करण्यात आले असून अप क्र. ३५२/२०२४ कलम ३३१ (३), ३३१ (४), ३०५ (अ) भा. न्या. सं. मध्ये **आरोपी नामे सोमनाथ उर्फ गुड्डु प्रदिप खापेकर** याला अटक करण्याची प्रक्रीया सुरु आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु असुन नमुद गुन्ह्यात ईतर सुध्दा आरोपी वाढण्याची व अधिक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग उमरेड श्रीमती वृष्टी जैन, उमरेड पोलीस

स्टेशनचे पोलीस निरीक्षक अनिल राउत, पोलीस अंमलदार प्रदिप चवरे, राधेश्याम कांबळे, पंकज बट्टे, गोवर्धन शहारे, उमेश बान्ते, राजन भोयर, सचिन बळगे पोस्टे उमरेड ना.ग्रा. यांनी यशस्वरीत्या पार पाडली.

## पो.स्टे. अरोली हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक १२/०९/२०२४ रोजी पोस्टे अरोली येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, पोलीस स्टेशन अरोली हद्दीतील खात येथे घोटमुंडरीकडे जाणाऱ्या रोडचे बाजूला असलेल्या खाली जागेत डी. पी. जवळ झाडी झुडपामध्ये गोळा होवुन काही लोक ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोस्टे अरोली येथील स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर स्टाफ यांनी खात येथे घोटमुंडरीकडे जाणाऱ्या रोडचे बाजूला असलेल्या खाली जागेत डी. पी. जवळ सापळा रचुन छापा टाकला असता **आरोपी नामे—१) फिरोज युसुफ झडीये, रा. वार्ड क्र. १ खात २) किशोर यशंवत केवट, रा. वार्ड क्र. १ खात ३) श्रीकृष्णा जाडुलाल मिसार रा. देवमुंढरी ४) जयनस रामप्रसाद सिकरीया रा. वार्ड क्र. १ खात ५) विकास प्रभुजी उमाठे रा. वार्ड क्र. १ खात ६) जर्नाधन विठोबा सिंगाडे, रा. देवमुंढ** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०६ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन नगदी ३,३६५/—रू. घटनास्थळी डावावर ४५०/—रु, दोन ५२ तास पत्ते १००/रु असा एकुण ३९१५/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे अरोली येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे अरोली येथील ठाणेदार सपोनि स्नेहल राउत, पोहवा शाम पोकळे, संदीप बाजनघाटे, पोलीस अंमलदार विक्की कोथरे, राकेश राउत, रामरतन तिजारे, उमेश परसगाये, चालक दुर्योधन मस्के यांनी पार पाडली.

## प्राणांतिक अपघात

पोस्टे केळवद अंतर्गत महालक्ष्मी पेट्रोलपंप केळवद येथे दिनांक ११/०९/२०२४ चे २०/२० वा. दरम्यान यातील **मृतक नामे— उजेर शब्बीर अहमद रा. गोधनी बोखारा जि. नागपुर** हे आपल्या मोटरसायकल क्र. एम.पी.—२८/एम. डी—५५०९ ने मोहखेड येथुन केळवद मार्गे नागपुरला जात असतांना केळवद येथील महालक्ष्मी पेट्रोलपंप जवळ कोणत्यातरी अज्ञात वाहनाने त्याला जोरदार धडक मारुन त्याचा अपघात केला. ज्यामध्ये मृतक याचे चेह—यावर गंभीर मार लागल्याने पुढील वैद्यकीय उपचारकामी ग्रामिण रूग्णालय सावनेर येथे नेले असता डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— जुनेद युसुफ शेख, वय २१ वर्ष , रा. वॉर्ड नं. ०५ सावनेर यांचे रीपोर्ट वरून पोस्टे केळवद येथे कलम २८१,१२५ (बी) १०६ (१) बिएनएस, सहकलम १३४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंद असुन केळवद पोलीस अज्ञात वाहन आणि आरोपीचा शोध घेत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**